**SHIVAJI UNIVERSITY,** KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ DATE : 01-Sep-15 9:07:26 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये/परिसंस्था,

विषय :- परीक्षा अर्ज व निकाल इत्यादीबाबतच्या त्रुटींच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत..

महोदय/महोदया,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, ऑक्टोबर-२०१५ मध्ये होणा-या परीक्षांचे ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज जनरेट होण्यास विलंब लागत आहे किंवा ज्या विद्यार्थ्यांचे अद्यापि निकाल अपडेट होत आहेत त्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज त्या त्या निकालानंतर तयार होत आहेत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विना विलंब शुल्काने स्विकारावेत.

तसेच डबल ग्रॅज्युएशनसाठी परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज मॅन्युअली स्विकारावेत. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांना १६ अंकी पीआरएन नाहीत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे यापूर्वीच्या परीक्षांचे अर्ज आणि निकाल unishivaji.ac.in वरील प्रणालीतून जाहीर झालेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांचे मॅन्युअली परीक्षा अर्ज स्विकारावेत. यापूर्वीच्या दिनांक १७ ऑगस्ट २०१५ च्या परिपत्रकान्वये प्रोव्हिजनल ॲडमिशनबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

याप्रमाणे स्विकारलेले मॅन्युअली अर्ज सिस्टिममध्ये इनवर्ड करण्यासाठी सर्व महाविद्यालयांना स्वतंत्रपणे जिल्हावार शेडयुल कळविण्यात येईल. त्यावेळी सिस्टिममध्ये काम करणा-या संबंधित कर्मचा-याला कळविण्यात येणा-या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात याव्यात ही विनंती.

**तरी परीक्षा अर्जांसाठी कोणत्याही विद्यार्थ्यांना व महाविद्यालयीन कर्मचा-यांना थेट विद्यापीठात पाठविण्यात येऊ नये** अशा सूचना सर्व संबंधित घटकांना आपल्यामार्फत देण्यात याव्यात जेणेकरून ऑड नंबर्स देण्याची गरज भासणार नाही आणि परीक्षा कामकाज सुरळितपणे पार पडेल.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-

उपकुलसचिव

प्रत :- सर्व परीक्षा विभागप्रमुख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

C:\Users\acer\Desktop\new desktop\circular for exam form.docx/mahadeshwar/